**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग यांच्याकडे दाखल झालेले द्वितीय अपील.**

**अपील क्रमांक २००६/३२६/०२**

**श्रीमती भागीरथीबाई टाकसाळी, ---- अपीलकर्ती**
**रा. १६,सिताराम सदन,रामनगर,**
**फायरब्रिगेडच्या मागे औरंगाबाद**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
**अधीक्षक, जिल्हा भूमिअभिलेख ,औरंगाबाद. --- उत्तरवादी**

**विवेचन**

श्रीमती भागीरथीबाई टाकसाळी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम १९(३) अन्वये नगर भूमापनअधिकारी औरंगाबाद जन माहिती अधिकारी व जिल्हा निरीक्षक अधीक्षक भूमिअभिलेख औरंगाबाद प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे विरुध्द अपील दाखल केले. अपीलासोबत जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज किंवा प्रथम अपीलीय प्राधिका-याकडे केलेले अपील नव्हते. तरीही श्रीमती भागीरथीबाई टाकसाळी, औरंगाबाद यांचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अपीलाची सुनावणी दिनांक २२.८.२००६ रोजी औरंगाबाद येथे ठेवण्यात आली. सुनावणीच्या वेळेला अर्जदार गैरहजर होते. पण श्री. एस.एन. घोडेकर अधीक्षक भूमिअभिलेख व श्री. एम.एम. खडतरे नगरभूमापनअधिकारी हे उपस्थित होते. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन आले की, नगरभूमापन अधिकारी औरंगाबाद यांच्याकडे श्रीमती भागीरथीबाई टाकसाळी यांनी केलेला ७

डिसेबंर,२००५ रोजी केलेला अर्ज माहितीच्या अधिकाराखाली नव्हता तर तो मोजणीबाबत साधा अर्ज होता. सदर अर्जाला दिनांक १३.२.२००६ रोजी नगर भूमापन अधिकारी औरंगाबाद यांनी उत्तर दिलेले आहे. जणुकाही आधी केलेला अर्ज हा माहितीच्या अधिकारा खाली केलेला अर्ज आहे असे समजुन दिनांक ९ फेब्रुवारी,२००६ रोजी अर्जदाराने दिनांक ७.१२.२००५ रोजी दिलेल्या पत्राला अनुलक्षुन अजुनही माहिती मिळालेली नाही असे अपील पत्र रुपाने अधीक्षक भूमिअभिलेख औरंगाबाद यांच्याकडे केलेले आहे. कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मुळ अर्ज व प्रथम अपील हे माहितीचा अधिकाराच्या अधिनियमाखालचे नाही. व अर्जदार उपस्थित नसल्यामुळे त्यांची बाजुही समजुन घेता येत नाही. तरी पण अधीक्षक, भूमिअभिलेख औरंगाबाद यांना अर्जदाराने केलेली तक्रार तपासुन पाहुन योग्य ते उत्तर देण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

## आ दे श

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सु.वि. जोशी )

औरंगाबाद. दिनांक-२५/८/०६ राज्य मुख्य माहिती आयुक्त

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग यांच्याकडे दाखल झालेले द्वितीय अपील.

अपील क्रमांक २००६/३२४/०३

श्री. गुट्टे करण ज्ञानोबा, --- - अपीलकर्ता
द्वारा:- ॲड. मुंढे के.बी. (कर सल्लागार),
नरवाडे दवान्या शेजारी,शिवाजीनगर,
परभणी-४३१४००१.

विरुध्द

अपिलीय प्राधकारी तथा ---उत्तरवादी
कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबद

विवेचन

अपीलार्थी श्री. करण ज्ञानोबा गुट्टे रा. परभणी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे जन माहिती अधिकारी यांना अर्ज सादर करुन एम.एस्सी. रसायनशास्त्र मार्च,एप्रील,२००५ या परीक्षेतील उत्तरपत्रिकेच्या झेरॉक्सप्रती मागितलेल्या आहे. अशा प्रकारच्या छायाप्रती पुरविण्याचे कायदेशीर बंधन नसल्यामुळे छायाप्रती पुरविता येऊ शकत नाही असे उत्तरही विद्यापीठाने दिनांक १४.१२.२००५ रोजी दिलेले आहे.

वरील निर्णया विरुध्द अर्जदार श्री. गट्टे यांनी दिनांक ३०.१२.२००५ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये कुलगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. परंतु केंद्रीय

माहितीचाअधिकार अधिनियम २००५ नियम ८ (घ),(ड),(ज) आणि (ञ) अन्वये उत्तरपत्रिकेच्या छायाप्रती देता येत नाही असा निर्णय अपीलात देण्यात आला. या विरुध्द अपीलकर्त्यांनी आयोगाकडे दिनांक २३.२.२००६ रोजी अधिनियमाचे कलम १९ (३) द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी दिनांक २२.८.२००६ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली त्यावेळेला डॉ. एम.जी. गुमास्ते ,परीक्षा नियंत्रक तथा अपीलीय प्राधीकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद  व श्री. व्ही. बी. मोटे, जनमाहिती अधिकारी हे  उपस्थित होते.

उत्तरीपत्रिकांच्या छायाप्रती मिळाव्यात हा मुद्दा अनेकदा मा. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयासमोर आला असता अशा छायाप्रती  बोर्डाने किंवा विद्यापीठाने देणे हे बंधनकारक नाही असाच निर्णय वेळोवेळी देण्यात आलेला आहे. उत्तरपत्रिकेचे मुल्यांक्न करणे ही काही पाटीसिपेटरी प्रक्रिया नाही. व दिलेल्या मार्कसच्या बाबतीत शक्य तितक्या लौकर  अंतिम स्वरुप यावयाला पाहीजे असेही मत मा. न्यायालयाने व्यक्त केलेले आहे. म्हणून  अधिकार म्हणुन जर उत्तरपत्रिकेची प्रत  मागता येत नसली तरीही मार्गदर्शनाच्या दृष्टीकोनातुन व विद्यार्थ्याच्या मनात परीक्षा पध्दतीबाबत कोणताही संभ्रम राहु नये म्हणुन मुंबई विद्यापीठ,शिवाजी विद्यापीठ व आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी सुध्दा उत्तरपत्रिकाच्या छायाप्रती द्यावयाला सुरुवात केलेली आहे.  डॉ.बाबासाहेब आंबेडकर  विद्यापीठात ही सुरुवात ऑक्टोंबर,२००५ परीक्षेनंतर करण्यात आली आहे. व अर्जदार यांनी परीक्षा मार्च, एप्रील,२००५ मध्ये दिलेली असल्यामुळे साहजिकच त्यांना ही सवलत उपलब्ध नाही.

या अपीलातील अपीलक र्ते श्री. करण ज्ञानोबा गुट्टे यांनी याबाबतीत मा. उच्च न्यायालयात सुध्दा रिट पीटीशन दाखल केले होते. ते रिट पीटीशन सुध्दा फेटाळुन लावण्यात आले आहे.

**--आदेश--**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**औरंगाबाद. दिनांक-२५/८/२००६**

**( डॉ. सु.वि. जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग यांच्याकडे दाखल झालेले द्वितीय अपील.**

**अपील क्रमांक २००६/३२५/०२**

**श्री.भाई सुरेश झुंबरलाल तापडीया, -- - अपीलकर्ता**
**छत्रपती शिवाजी हायस्कुलजवळ,**
**उस्मानाबाद.**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधकारी तथा कार्यकारी अभियंता, --उत्तरवादी**
**(स्था.स्तर),विभाग,उस्मानाबाद.**

**---<u>विवेचन</u>--**

**श्री. सुरेश तापडिया रा. उस्मानाबाद यांनी जन माहिती अधिकारी व कार्यकारी अभियंता (स्थानिक स्तर) विभाग,उस्मानाबाद यांना माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम ६ अन्वये अर्ज सादर करुन पुढील माहिती मागितलेली आहे.**

**१. कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याच्या गेट दुरुस्तीसाठी लागणा-या रबर सीलची किती रुपयाची खरेदी करण्यात आली.**

**२. सदर खरेदीसाठी कोणत्या वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आली? सदर जाहीरातीची छायाकिंत प्रत.**

**३. संबधित खरेदीसाठी जाहीरात देऊनही तुकडे पाडून तीन कोटेशनवर खरेदीचे आदेश देण्यात आले आहेत काय कोटेशनच्या छायांकित प्रती.**

**४. खरेदीसाठी अधीक्षक अभियंता औरंगाबाद यांचेकडे पाठविलेला मंजूरीसाठीचा प्रस्ताव आणि संबंधिताचे आलेले मंजूरी पत्र यांच्या छायाकिंत प्रती.**

५.	सदरील रबर सील खरेदी करीत असतांना खरेदीदाराकडुन किती अनामत रक्कम घेण्यात आली? निविदेमध्ये नंतर काही दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत काय? निविदा सूचनेची छायाकिंत प्रत.

६.	सदर निविदा स्वीकारुन पुरवठयाचे आदेश कोणत्या कार्यकारी अभियंत्याच्या सहीने काढण्यात आले.१

तसेच पुरवठयाची रक्कम कोणत्या कार्यकारी अभियंत्याच्या सहीने अदा करण्यात आली ?

या अर्जाचे उत्तर देतांना दिनांक २५.१.२००६ च्या पत्राने कार्यकारी अभियंता (स्थानिकस्तर)उस्मानाबाद यांनी असे कळविले आहे की, रु. ५०/- या कार्यालयात भरुन माहिती घेऊन जावी. त्या प्रमाणे दिनांक ३०.१.२००६ रोजी माहिती अर्जदारास पुढील माहिती देण्यात आली.

१)	निविदा सुचना वृत्तपत्राची छायांकित प्रत.

२)	कोटेशन छायांकित प्रतिः-

अ) राजा बर अँड टयुब प्रा.लि. अहमदनगर.

ब) गजानन रबर इंडस्ट्रीज परंडा जि. उस्मानाबाद.

क) ओरीएंट ऑटोमॅक नवी मुंबई.

३)	निविदाचे तुलनात्मक विवरण पत्र छायांकित प्रत.

४)	अधीक्षक अभियंता ल.पा. (स्थानिक स्तर) मंडळ औरंगाबाद यांचे मंजुरी पत्र दिनांक १८.८.२००५ ची छायाकिंत प्रत.

५)	कार्यकारी अभियंता ल.पा. (स्थानीकस्तर) विभाग,उस्मानाबाद यांचे पत्र दिनांक २६.८.२००५ ची छायांकित प्रत.

वरील माहितीने समाधान न झाल्यामुळे व माहिती देतांना अपीलीय प्राधिकारी कोण आहे याचा

उल्लेख न केल्यामुळे अर्जदाराने सरळ आयोगाकडे थेट अपील केले. या अपीलाची सुनावणी दिनांक २२.८.२००६ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. अर्जदाराने प्रथमच कार्यालयामध्ये जनमाहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांचे बोर्ड नाहीत अशी तक्रार आयोगाकडे केली. आपण किती दिवसापुर्वी या कार्यालयात गेला होता असे विचारले असता आठ दिवसा पुर्वीच या कार्यालयाला भेट दिली असे त्यांनी सांगितले. कार्यकारी अभियंता ल.पा. (स्थानिक स्तर) उस्मानाआद यांनी असे बोर्ड असल्याचे प्रतीपादन देत दर्शनीभागवर लोकंना दिसतील अशा ठिकाणी नाही असे अर्जदाराकडुन केलेल्या तक्रारीच्या चौकशीत निष्पन्न झाल्यामुळे हे दोन्ही बोर्ड कार्यालयाच्या दर्शनीभागावर सहजतेने दिसेल अशा ठिकाणी लावण्यात यावे असे निर्देश देण्यात आले. माहिती वेळेत देण्यात आलेली नाही अशी तक्रार अर्जदाराने केलेली आहे. पण २६डिसेंबर,२००५ च्या पत्राला २५ जानेवारी,२००६ रोजी उत्तर पाठविल्याचे दिसते. व पत्र हे प्रत्यक्षात २८ जानेवारी,२००६ रोजी शिपायामार्फत देण्यात आलेले आहे. ३० दिवसाच्या मुदतीत माहिती दिली असे दर्शविण्यासाठी शेवटच्या दिवशी पत्र पाठविण्याच्या प्रवृत्तीवर आयोगाने नेहमीच आक्षेप घेतला आहे. याही प्रकरणामध्ये माहितीसाठी फी भरण्यासाठीचे दिनांक २५ जानेवारीचे पत्र मुदत संपल्यानंतर तीन दिवसानी अर्जदारास मिळालेले आहे. माहिती ही अर्जदारास ३० दिवसाच्या आंत मिळावी असे जेव्हा अपेक्षित आहे तेव्हा अर्जदारास उशिरा २६ व्या किंवा २७ व्या दिवशी फी भरण्याचे पत्र मिळाले तर तो उर्वरीत ३-४ दिवसात फी भरुन माहिती प्राप्त करुन घेवू शकेल. अशा अधिका-यांनी माहिती ही वेळेत दिली गेली नसल्यामुळे जी उर्वरीत माहिती द्यावयाची राहिली ती विनामुल्य देण्यात यावी. तसेच शुल्क म्हणुन घेतलेले रु.५०/- परत करावे असे निर्देश देत आहे. मात्र माहिती न देण्यात असदहेतू दिसत नाही त्यामुळे विलंबाबददल शास्ती लावण्यात येत नाही. पण ३० दिवसाची वाट न पाहता शक्य तितक्या लवकर किती फी भरावयाची हे पत्र अर्जदारास पाठवावे. याबददल कार्यकारी अभियंता यांना समज देण्यात येत आहे. कोणती माहिती मिळाली नाही याबददल प्रत्येक मुददा

तपासला असता असे दिसुन आले की, खरेदीसाठी अधीक्षक अभियंता ल.पा. (स्थानिक स्तर) औरंगाबाद यांच्याकडे पाठविलेला मंजुरीसाठीच्या प्रस्तावाची प्रत अर्जदारास मिळालेली नाही. फक्त अधीक्षक अभियंता ल.पा. (स्थानिकस्तर) औरंगाबाद यांनी दिलेल्या मंजुरी पत्राची प्रत देण्यात आली आहे. कार्यकारी अभियंता ल.पा. (स्थानिकस्तर) विभाग, उस्मानाबाद यांनी पाच दिवसाच्या आंत ती माहिती त्वरीत विनामुल्य द्यावी.

**आ दे श**

अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येते.

( डॉ. सु.वि. जोशी )

औरंगाबाद,दिनांक २५/८/०६ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग यांच्याकडे दाखल झालेले द्वितीय अपील.**

**अपील क्रमांक २००६/----/०२**

**श्री. सुभाष दामोदर देशमुख,** **--- - अपीलकर्ता**
**६२,शिवदत्त सह.गृह नि.संस्था,सिडको,**
**एन-८,डॉ. वैद्य यांचे दवाखान्याशेजारी,**
**सिडको,औरंगाबाद.**

**विरुध्द**

**१) अपिलीय प्राधकारी तथा** **- --- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी,जि.प. औरंगाबाद.**
**२) मुख्याध्यापक,**
**विद्यासागर कन्या प्रशाला खंडाळा,ता. वैजापूर,**
**जिल्हा औरंगाबाद.**

## विवेचन

श्री. सुभाष दामोदर देशमुख रा. एन-8 सिडको,औरंगाबाद यांनी मुख्याध्यापक विद्यासागर कन्या प्रशाला खंडाळा ता. वैजापूर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे मलम 6 अन्वये दिनांक 7.2.2006 रोजी अर्ज सादर करुन काही माहिती विचारलेली होती. मुख्याध्यापक,विद्यासागर कन्या प्रशाला खंडाळा यांनी त्यांचे दिनांक 25.2.2006 रोजीचे पत्राने रुपये 1000/- शुल्क जमा करावे व आपण यातील जी रक्कम अतिरिक्त ठरेल ती मनीऑर्डरने परत करण्यात येईल असे लिहिले. या पध्दतीने शुल्काची मागणी करणे हे अयोग्य आहे. माहितीचा कायद्याखाली अर्ज आल्यानंतर द्यावयास लागणा-या माहितीचे पृष्ठे किती त्यांचा अंदाज जमा करुन घेऊन प्रत्येक पृष्ठास रु. 2/- या प्रमाणे पृष्ठ संख्या व द्यावे लागणारे शुल्क अशा दोन्ही बाबीबाबत पत्र लिहिले पाहिजे. अर्जदारास द्यावी लागणारी माहिती पुन्हाएकदा तपासुन अर्जदारास योग्य ती रक्कम कळविण्यात यावी.

**<u>--आदेश--</u>**

**( डॉ. सु.वि. जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**